# धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
राजन राजे


संदर्भ क्र.________ दिनांक : २५/०८/२०१४

# मुठभरांविरूध्द बहुसंख्यकांनी उठाव करावा- न्या. बी. जी. कोळसे-पाटील

**प्रतिनिधी**

दि. २५ – मुठभरांविरूध्द बहुसंख्यकांनी उठाव करावा, असे आवाहन न्या. बी. जी. कोळसे-पाटील यांनी **‘धर्मराज्य पक्षा’**च्या **‘जनजागृती मेळाव्या’**त बोलताना केले. अध्यक्षस्थानी **‘धर्मराज्य पक्षा’**चे अध्यक्ष **राजन राजे** हे होते.

माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश शेट्टी आणि अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खुनाचा तपास स्पेशल इन्व्हेस्टिगेशन टीम **(एसआयटी)**द्वारे करण्यात यावा, यासाठी **‘धर्मराज्य पक्षा’**ने नवी मुंबईतील शेतकरी समाज मंदिर सभागृहात **‘जनजागृती मेळावा’** आयोजित केला होता. यावेळी सामाजिक विचारवंत न्या. बी. जी. कोळसे-पाटील बोलत होते. याप्रसंगी अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे पदाधिकारी राजीव देशपांडे, वंदना शिंदे, धर्मराज्य पक्षाचे महासचिव अनिल ठाणेकर, राजू फणसे, उपाध्यक्ष नितीन देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना न्या. बी. जी. कोळसे-पाटील म्हणाले, ‘कामगार स्वार्थीपणाने फक्त पगारवाढीसाठी लढतो. भ्रष्टाचाराशिवाय कामच होत नाही आणि लोक मुकाटपणे हे सार सहन करीत आहेत. यामुळे मुठभरांच्या हितासाठी सत्ता राबविणाऱ्या दलालांचे फावत आहे. काँग्रेस सरकारने एअर इंडिया विकली, आता नरेंद्र मोदी रेल्वे विकायला निघालेत. हे सारं बदलण्यासाठी बहुसंख्य कामगार-शेतकरी-दलित-आदिवासीनी मुठभर व्यापारी-भांडवलदारांविरूध्द उठाव करण्याची गरज निर्माण झाल्याचं’, न्या. कोळसे-पाटील यांनी म्हटलं.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना **राजन राजे** यांनी म्हटले की, खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकिकरण या **‘खाउजा’** धोरणानंतर गुजराती-मारवाडी व्यापारी वर्गाच्या या प्रस्थापित व्यवस्थेने जनतेला निर्दयपणे दाबण्यास सुरूवात केली आहे. यामुळे आज कंत्राटीकरणाद्वारे नव-अस्पृश्यता निर्माण करणे, आरक्षणामुळे जनतेत फुट पाडणे, लोकसंख्या वाढवून गुलाम निर्माण करणे, भ्रष्टाचाराला उघड प्रोत्साहन देणे यासारखी जनविरोधी धोरणे आखण्यास प्रस्थापित वर्गाने सुरू केली आहे. मानव आणि निसर्गाच्या या शोषणाविरोधात लढण्यासाठी श्रीकृष्णाच्या कर्मसिध्दांताचा सहारा घेण्याची गरज, राजे यांनी प्रतिपादन केली. याचबरोबर मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी माणसाच्या आत्मसन्मानासाठी **‘स्वायत्त महाराष्ट्रा’**ची स्थापना होणे आवश्यक असल्याचे राजे यांनी म्हटले.

**‘धर्मराज्य पक्षा’**च्या जनजागृती मेळाव्याला नवी मुंबईतील कामगार-कष्टकरी जनतेने प्रचंड गर्दी केली होती. या सभेला **‘धर्मराज्य पक्षा’**चे उपाध्यक्ष राजू सावंत, अण्णा साळुंखे, ठाणे जिल्हा समन्वयक राजेश गडकर, ठाणे शहर अध्यक्ष सचिन शेट्टी, नवी मुंबई शहर अध्यक्ष निवास साळुंखे, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, महासचिव महेशसिंग ठाकूर, सचिव रूपेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते. या सभेचे सूत्रसंचालन जयेंद्र जोग यांनी केले.


ए/एर२०३, ‘पांचजन्य’-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस् को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, ‘पांचजन्य’, शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००


*“सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढ्यासाठीच राजकारण!”...*